पुणे शहर पोलीस

# दर्पण

## ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलिस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो.स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पण या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम यांची माहिती दर्पण या पुस्तकामुळे अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC8814

---

प्रति,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
बिबवेवाडी पो.स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम. बी. [illegible] स.पो. उप.निरीक्षक.
बिबवेवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,
उपरोक्त विषयान्वये आपणास सादर करतो की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी त्यांचे संकल्पनेतून साकार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तिकेचे आम्ही [illegible] वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांकडून केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यात आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही स्टेशन डायरी येथे पोलीस ठाण्याकडील 'दर्पण' पुस्तिका ही ठेवून असून पो.स्टे. येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांनी वाचण्यास देऊन सदर पुस्तकामुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

स.पो. उप.निरीक्षक
बि.वाडी पो.स्टे पुणे.

# उत्कृष्ट कार्य

उपलब्धि
फाइल

# Pune police get award from FICCI for smart policing

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**NEW DELHI/ PUNE**
The Pune city police have received two awards from the Federation of Indian Chamber of Commerce and Industries (FICCI) for smart policing Awards for 2019. DCP (Zone 1) Swapna Gore received the award from Jitendra Singh, Minister of State, Govt. of India, during a programme organised by FICCI and Vivekananda International Foundation on Homeland Security in New Delhi on Friday.

FICCI on an annual basis organises a conference on Homeland Security, which witnesses participation of senior officials from Government of India, Central Armed Police Forces (CAPFs) and various State Police Forces (SPFs). FICCI has instituted an award for best practices in smart policing in India. The objective is to promote initiatives taken by the police for the safety and security of Indian citizens. The 11th edition of the Homeland Security programme was organised in partnership with 'Vivekananda International Foundation' with the theme of 'Innovation led Cyber Crime Management'.



**FETED:** Union Minister Dr Jitendra Singh presenting the Smart Policing Awards to DCP Swapna Gore (right) at the Homeland Security 2019 Conference, in New Delhi, on Friday.

According to the Federation of Indian Chamber of Commerce and Industries (FICCI), over 195 entries were received from various law enforcement agencies and the jury members presented the Special Jury Award and Smart Police Officer award to Pune city police for the initiatives of 'Criminal Intensive Response Project (CrISP)' and 'Proactive Control on Women Trafficking and Control on Red Light Area Crimes'. CrISP is a crime control project with an objective of regularly tracking known criminals and is being run by Crime Branch, Pune city police.

Commissioner of Police Dr K Venkatesham had earlier told Sakal Times that till date, details of over 42,000 criminals have been updated resulting in reduction in crimes under various heads such as 40 per cent reduction in robbery cases, 12 per cent reduction in vehicle theft cases and 20 per cent reduction in house break-ins as compared to last year's data.

Proactive Control on Women Trafficking and Control on Red Light Area Crimes is a specific target oriented initiative aimed at rehabilitation of sex workers and reducing crime and illegal activities in red light areas of the city through various interventions such as detailed social study of sex workers and their families, regular nakabandi and constant monitoring of illegal activities and taking appropriate action resulting in reduction in crimes in red light areas, police officials said.

After getting the award, Venkatesham tweeted, "Pune got 2 out of 8 received by Maharashtra Police. We will DO MORE."

## दिलीप बोरस्ते, राजेंद्र कदम, राजेंद्र पोळ, अविनाश मराठे, मनोहर चिंतल्लू यांचा समावेश

# जिल्ह्यातील ९ पोलिसांना राष्ट्रपतीपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पुणे जिल्ह्यातील २ अधिकाऱ्यांना विशेष प्रावीण्याबद्दल, तर ९ पोलिसांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अपर पोलीस अधीक्षक असलेले दिलीप बोरस्ते हे १९८६ रोजी पोलीस उपनिरीक्षक म्हणून भरती झाले. त्यांना उत्कृष्ट तपासाबाबत पोलीस महासंचालकांचे पदक तीन वेळा मिळाले आहे. पुणे शहरातील अंजनाबाई गावित, सीमा व रेणुका गावित यांना अटक करून महाराष्ट्रभर गाजलेल बालहत्याकांड त्यांनी उघडकीस आणले होते. पुढे सीआयडीने केलेल्या तपासात आरोपींना फाशी झाली. त्यांनी आपल्या ३३ वर्षांच्या सेवेत मुंबई शहर, नागपूर, शहर, रत्नागिरी शहर व ग्रामीण, नाशिक शहर, ठाणे शहर व सीआयडीमध्ये काम केले आहे.

पोलीस उपअधीक्षक राजेंद्र कदम हे पोलीस उपनिरीक्षक म्हणून १५ जून १९८८ रोजी पोलीस सेवेत रुजू झाले. त्यांनी मुंबई, पुणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग या ठिकाणी आजवर काम केले. ३१ वर्षांच्या सेवा काळात त्यांना एकूण ५७० बक्षिसे मिळाली आहेत. त्यात ३७ खुनाचे गुन्हे, १० बलात्काराचे गुन्हे, २८ बेकायदेशीर पिस्तुले जवळ बाळगल्याचे, १३ अमली पदार्थ जवळ बाळगल्याचे गुन्हे उघडकीस आणल्याबद्दल बक्षिसे आहेत. त्यांनी तपास केलेल्या १२ खुनाच्या गुन्ह्यांतील



दिलीप बोरस्ते



राजेंद्र कदम



राजेंद्र पोळ



अविनाश मराठे



मनोहर चिंतल्लू

आरोपींना जन्मठेपेची शिक्षा मिळाली आहे. खुनाच्या गुन्ह्यात ६ महिन्यांपासून फरारी असलेला मनीष चड्ढा याला झारखंडमधील धनबाद येथून पकडून जेरबंद केले आहे.

पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पोळ हे १९८४मध्ये पोलीस दलात रुजू झाले. त्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल ४३५ बक्षिसे मिळाली आहेत. परकीय नागरिक नोंदणी विभागात त्यांनी १ हजाराहून अधिक परकीय नागरिकांना बिगरपरवाना तसेच व्हिसा मुदत संपल्यानंतर राहताना मिळून आलेल्यांना भारतातून परत त्यांच्या देशात पाठविण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. बोगस व्हिसाप्रकरणी भोपाळ राज्यातील रॅकेट पकडणाऱ्या पथक, बीपीओ फ्रॉड गुन्ह्याच्या तपास पथकात त्यांनी काम केले आहे. या पथकाला २००७मध्ये नॅसकॉमचे इंडियन सायबर कॉप अ‍ॅवॉर्ड मिळाले होते. परिमंडळ ४ मध्ये काम करताना ९०पेक्षा अधिक गुन्हेगारांना तडीपार करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता याबद्दल त्यांना महासंचालकांचे पोलीस सन्मानचिन्ह मिळाले आहे.

सहायक पोलीस उपनिरीक्षक अविनाश मराठे यांना आतापर्यंत ३३१ बक्षिसे मिळाली आहेत. अब्दुल करीम तेलगीच्या बनावट मुद्रांकप्रकरणी स्थापन केलेल्या विशेष पथकात त्यांनी काम केले आहे. त्यासाठी त्यांची सीबीआयकडे खास प्रतिनियुक्तीवर नेमणूक झाली होती. ते असलेल्या तपास पथकाने केलेल्या कामगिरीत १२० चोऱ्या, घरफोड्यांमध्ये आरोपींना शिक्षा झाली आहे. सहायक पोलीस फौजदार मनोहर लक्ष्मण चिंतल्लू हे दत्तवाडी पोलीस ठाण्यात नेमणुकीला असून २० जानेवारी १९८३ रोजी पोलीस दलात रुजू झाले. त्यांना आतापर्यंत ४१८ बक्षिसे मिळाली आहेत. तसेच, ७५ हजारांचे रोख बक्षीस मिळाले आहे

पुढारी – दि. ०७ ऑगस्ट, २०१९

# पोलिसांनी वाचवले बेशुद्ध महिलेचे प्राण

**पुणे : प्रतिनिधी**

बाथरूमला गेल्यावर पाय घसरून पडल्यानंतर बेशुद्ध अवस्थेत असलेल्या महिलेच्या घराचा दरवाजा तोडून त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. स्वारगेट पोलिसांच्या या तत्पर कार्यवाहीने महिलेचे प्राण वाचले आहेत.

परविन अन्वर सत्तार (रा. मीरा सोसायटी, पूनावाला गार्डन) असे बेशुद्ध अवस्थेत घरात अडकलेल्या महिलेचे नाव आहे. सध्या त्यांच्यावर रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. परविन सत्तार यांचे पती आणि मुलगा नोकरीच्या निमित्ताने विदेशात असतात. सदर ठिकाणी त्या एकट्याच राहतात. त्यामुळे घरात चक्कर येऊन पडल्यानंतरदेखील याची माहिती कोणाला लवकर मिळाली नाही.

परविन सत्तार या नेहमीप्रमाणे सात वाजता घरातून बाहेर पडतात; मात्र त्या दिवशी बराच कालावधी उलटून गेला तरी त्यांनी आपल्या घराचा दरवाजा उघडला नाही. त्यामुळे शेजारच्या लोकांना काहीतरी शंका आल्यामुळे त्यांनी याची माहिती पोलिस नियंत्रण कक्षाला दिली. त्यानुसार या घटनेची माहिती स्वारगेट पोलिसांना देण्यात आली. दरम्यान महर्षीनगर पोलिस चौकी मार्शलचे शिपाई फुंदे आणि रणसिंग यांनी तत्काळ मीरा सोसायटीकडे धाव घेतली. या वेळी त्यांना सत्तार यांच्या फ्लॅटचा दरवाजा बंद असल्याचे दिसले. शेजारील लोकांच्या मदतीने त्यांना फोनद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला तरीदेखील कोणतेच उत्तर मिळाले नाही. याची माहिती पोलिसांनी अग्निशमन केंद्राला दिली; परंतु त्या मार्गावर असलेल्या ट्रॅफिकमुळे गाडी पोहोचण्यास विलंब लागत होता. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत फुंदे आणि रणसिंग यांच्यासह दामिनी मार्शलच्या महिला कर्मचारी स्वाती रणसिंग व भालेराव यांनी नागरिकांच्या मदतीने फ्लॅटचा दरवाज तोडून आतमध्ये प्रवेश केला. या वेळी परविन सत्तार या बेडच्या शेजारी बेशुद्ध अवस्थेत आढळल्या. त्यांना उचलून जागे करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्या शुद्धीवर आल्या नाहीत. त्यानंतर पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांना नजीकच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले.

सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. यानंतर या घटनेची माहिती सत्तार यांच्या नातेवाइकांना देण्यात आली.

## फ्लॅट संस्कृतीत माणूस होतोय एकलकोंडा

**1** गेल्या महिन्यात वृद्धाचा चतुःशृंगी परिसरात बंद फ्लॅटमध्ये मृत्यू झाला. तीन दिवसांपासून त्या वृद्धाचा मृतदेह घरातच पडून होता. जेव्हा घरातून दुर्गंधी येऊ लागली तेव्हा याची माहिती शेजाऱ्यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिस आले. त्यांनी घराचा दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला. त्यात वृद्धाचा मृत्यू झाल्याचे लक्षात आले. मृत्यू झालेल्या व्यक्तीची मुले नोकरीच्या निमित्ताने विदेशात होती; त्यामुळे ते एकटेच घरात राहत होते. दिवसेंदिवस शहरात अशा घटनांमध्ये वाढ होत आहे.

**2** माणसाने आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने चंद्राला गवसणी घातली; मात्र हाच माणूस एकलकोंडा बनत चालला आहे. त्यात शहरात उदयास आलेली फ्लॅट संस्कृती. यामुळे तर माणसाचे माणूसपण हरवत चालले आहे. कित्येक वर्षे एकाच सोसायटीत राहूनदेखील आपला शेजारी कोण आहे याची माहिती नसते. अशातच परदेशात किंवा इतर राज्यात नोकरीसाठी जाणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे घरामध्ये अनेकदा वृद्ध आई-वडील राहत असतात. अनेकदा त्यांचा मृत्यू कधी झाला हेसुद्धा समजत नाही.

**लोकमत** – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# लुटारुंकडून पाठलाग करुन दहा लाख हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क



**विमाननगर :** खासगी कंपनीच्या कर्मचाऱ्याला हत्याराचा धाक दाखवून दहा लाखांची रोकड लुटणाऱ्या दोघांना सतर्क पोलिसांनी पाठलाग करुन रंगेहाथ पकडले. सोमवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास येरवड्यातील संगमवाडी ते सादलबाबा चौकात हे थरारनाट्य घडले. विशेष सुरक्षा विभागाचे पोलिस नाईक सुशिल बेंद्रे व वाहतूक शाखेचे शिपाई गणेश थोपटे या दोन सतर्क पोलिसांनी प्रसंगावधान राखून रोख रकमेसह दोघांना जेरबंद केले. याप्रकरणी महेश मोहन पाटोळे (वय २८)व ओंकार प्रकाश उत्तेकर (वय २५ ,दोघेही रा. दापोडी) या दोघांविरुध्द धमकावून रोकड लुटल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

पोलिस निरीक्षक युनूस शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, संगमवाडी रस्त्याने ब्रिक्स कंपनीचे राहुल खेसे (रा.नायगाव ,पुरंदर) हे सोमवारी दिवसभरात जमा केलेली सुमारे दहा लाख रुपयांची रोख रक्कम कंपनीच्या ऑफिसमध्ये भरणा करण्यासाठी घेऊन चालले होते. संगमवाडी येथे पाच वाजण्याच्या सुमारास दोन अनोळखी इसमांनी पल्सरवरुन येऊन त्यांच्या दुचाकीला धक्का दिला. गाडी नीट चालवता येत नाही का, असे म्हणून चाकूचा धाक दाखवून त्याच्या जवळील बॅग हिसकावली. याच वेळी त्याच रस्त्यावरुन पाठीमागून विशेष सुरक्षा विभागाचे पोलिस नाईक सुशिल बेंद्रे दुचाकीवरुन येत होते.त्यांनी हा सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला. त्यांनी तत्काळ त्या दोघांचा पाठलाग सुरु केला. संगमवाडी ते सादलबाबाचौका पर्यंत पाठलाग करत त्यांनी या गंभीर प्रकाराची माहिती पोलिसांना दिली.याचवेळी सादलबाबा येरवडा चौकात वाहतूक नियमन करणारे पोलिस शिपाई गणेश थोपटे यांनीदेखील तत्काळ दोघांनाही अडवले. दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांनी सतर्कतेने येरवडा पोलिसांच्या मदतीने रोख रक्कम व हत्यारासह त्यांना ताब्यात घेतले.

**लोकमत** – दि. २७ ऑगस्ट, २०१९



दिल्ली येथे पुरस्कार स्वीकारताना उपायुक्त स्वप्ना गोरे.

# राष्ट्रीय स्तरावर पुणे पोलिसांचा गौरव

## स्मार्ट पोलिसिंगसाठी दोन पुरस्कार

**पुणे : प्रतिनिधी**

स्मार्ट पोलिसिंगसाठी पुणे शहर पोलिसांना राष्ट्रीय स्तरावरील दोन पुरस्काराने दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर कॉमर्स इन्डस्ट्रीज (फिक्की) या संस्थेच्या वतीने सन २०१९ या वर्षासाठीचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपायुक्त स्वप्ना गोरे यांनी केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांच्या हस्ते नुकतेच हे पुरस्कार पुणे पोलिसांच्या वतीने स्वीकारले.

फिक्की आणि विवेकानंद इंटरनॅशनल फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात क्रिमिनल इंटेसिव्ह रिस्पॉन्स प्रोजेक्ट (क्रीस्प) आणि प्रोॲक्टिव्ह कंट्रोल ऑन वुमन ट्रॅफिकिंग ॲंड रेड लाईट एरिया क्राईम्स या दोन उपक्रमांकरिता स्पेशल ज्युरी अवॉर्ड आणि स्मार्ट पोलिस ऑफिसर अवॉर्ड पुणे शहर पोलिसांकरिता जाहीर करण्यात आले.

संस्थेच्या वतीने अंतर्गत सुरक्षा या विषयावर प्रत्येक वर्षी या परिषदेचे आयोजन करण्यात येते. यामध्ये वरिष्ठ अधिकारी, केंद्रीय सशस्त्र दले तसेच विविध राज्यातील पोलिस दलांची उपस्थिती असते. पोलिसांना भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षा वाढविण्याकामी प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. यामध्ये विविध सुरक्षा दलाचे सुमारे १९५ पेक्षा अधिक घटक सहभागी झाले होते.

Sakal Times - 18 August, 2019

# Maha Guv appreciates city police's efforts

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**PUNE** Maharashtra Governor Vidyasagar Rao, on Wednesday, appreciated the efforts taken by the city police in reaching out to people through the Service Excellence and Victim Assistance (SEVA) initiative. He was present for an event at Symbiosis college on Senapati Bapat Road.

At least 300 students under the aegis of the National Service Scheme (NSS) were

Bapat and other dignitaries were present for the event. The SEVA initiative of Pune police, has received a good response from residents. According to recent data shared by Pune Police Commissionerate, out of the 1.05 lakh residents called for feedback, 1.01 lakh people had something good to say about the department.

## SEVA INITIATIVE

Speaking at the event, Rao said that with the help of a number of citizen-friendly initiatives, Maharashtra police and Pune police have created their mark on a global platform.

"These initiatives have helped police officials in serving citizens in a better way and also to control crime. Going ahead, handling social media and technology will be a challenge for the police department, which they should try to overcome. A large women force is joining the service in the government and private fields. This workforce is capable of taking sensitive decisions," added Rao.

Guardian Minister Chandrakant Patil, Police Chief K Venkatesham, MP Girish

involved in the Service Excellence and Victim Assistance initiative to invite visitors to police stations and get their feedback. The SEVA application was started on September 1, 2018.

Under the Seva system, a police constable has been entrusted to note details of every person visiting police station. The constable is given a tablet to feed the names, phone numbers and photos of the visitors. Using the data, a team in Camp calls every person to know about their experience and whether they are satisfied with the services. At least 300 residents are called for feedback every day. The objective is to take feedback of residents within seven days of their visit to any of the police station and knowing whether their issues are resolved or not.

लोकसत्ता – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# भररस्त्यात साडेदहा लाखांची लूट; चोरट्यांना पाठलाग करून पकडले

प्रतिनिधी, पुणे

खासगी वित्तीय संस्थेच्या कर्मचाऱ्यांना कोयत्याचा धाक दाखवून साडेदहा लाखांची रोकड लुटून पसार झालेल्या चोरट्यांना येरवडा पोलीस ठाण्यातील कर्मचारी तसेच वाहतूक पोलिसांनी पाठलाग करून पकडले. चोरट्यांकडून साडेदहा लाखांची रोकड जप्त करण्यात आली. खासगी वित्तीय संस्थेतील एका कर्मचाऱ्याने दोन साथीदारांच्या मदतीने रोकड लुटण्याचा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणी ओंकार प्रकाश उत्तेकर (वय २४), महेश मोहन पाटोळे (वय २८, दोघे रा. दापोडी) यांना अटक करण्यात आली. त्यांचा साथीदार आणि लूट प्रकरणाचा मुख्य सूत्रधार तेजस सतीश पाटोळे (वय २४, रा. दापोडी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल बाळासाहेब खेसे (वय २८,रा. नायगाव, ता. पुरंदर) याने यासंदर्भात येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेसे ब्रिंग इंडिया फायनान्स या खासगी वित्तीय संस्थेत कामाला आहे. व्यापाऱ्यांकडून खेसे रोकड गोळा करण्याचे काम करतात. ग्राहकांना कर्जाने दिलेल्या रकमेच्या हप्त्यांची रक्कम संकलित करून ती कंपनीत जमा केली जाते.

रविवारी (२५ ऑगस्ट) दुपारी साडेचारच्या सुमारास खेसे दुचाकीवरून शिवाजीनगर भागातून निघाले. त्यांच्यावर पाटोळे, उत्तेकर यांनी पाळत ठेवली होती. येरवड्यातील डेक्कन कॉलेजच्या रस्त्याने ते विश्रांतवाडीतील कार्यालयात जात होते. त्यावेळी आरोपी उत्तेकर आणि पाटोळे यांनी खेसेला कोयत्याचा धाक दाखविला आणि साडेदहांची रोकड असलेली पिशवी हिसकावून नेली. त्यावेळी येरवडा पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी सुशील बेंद्रे गस्त घालत होते. दुचाकीवरून पसार झालेल्या पाटोळे आणि उत्तेकरचा बेंद्रे यांनी पाठलाग सुरू केला. काही अंतरावर दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून रोकड असलेली पिशवी जप्त करण्यात आली.

चोरट्यांचा साथीदार तेजस पाटोळे खासगी वित्तीय संस्थेत कामाला आहे. त्याने साथीदार पाटोळे आणि उत्तेकर यांना खेसे यांची माहिती पुरविल्याचे तपासात उघडकीस आले. पाटोळेचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

पुण्यनगरी – दि. १५ ऑगस्ट, २०१९

# स्मार्ट आणि तंत्रज्ञानस्नेही पोलिसिंगची गरज

## राज्यपाल सी. विद्यासागर राव : पुणे पोलिसांच्या लोकाभिमुख उपक्रमांचे लोकार्पण




▮ पुणे : प्रतिनिधी

एकविसाव्या शतकातील महाराष्ट्राला २१ व्या शतकातील पोलीस दलाची आवश्यकता आहे. यासाठी आपल्या पोलीस दलाचे स्मार्ट व तंत्रज्ञानस्नेही पोलीस दलात रूपांतर करावे, असे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी सांगितले.

पुणे शहर पोलिसांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोकाभिमुख उपक्रमांचा लोकार्पण सोहळा सिम्बायोसिस कॉलेज ऑफ कॉमर्स येथील विश्वभवन सभागृहात पार पडला. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार गिरीश बापट, अमर साबळे, डॉ. शां. ब. मुजुमदार, राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, जिल्हाधिकारी नवल किशोर राम पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, सहआयुक्त रवींद्र शिसवे उपस्थित होते. यावेळी पुणे शहर पोलिसांच्या सेवा, भरोसा, सी वॉच, थर्ड आय, क्रिस्प, सायबर सेल आदी उपक्रम राबविण्यात योगदान देणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पुणे शहर पोलिसांबाबत नागरिकांचा समज आणि अपेक्षा या संदर्भात सिंबायोसिस संस्थेतील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणाचे सादरीकरण करण्यात आले.

राव म्हणाले, महाराष्ट्रात वृद्ध लोकांची संख्या सर्वाधिक आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या वैयक्तिक, आर्थिक, भावनिक सुरक्षा आणि सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करणे हे मोठे आव्हान असेल. पोलीस आणि सर्व सार्वजनिक संघटनांनी महिला आणि वृद्ध लोकांसाठी संवेदनशील बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते सामाजिक, आर्थिक दुर्बल घटकांसाठी अधिक दयाळू असले पाहिजेत. पुण्यातील परदेशी नागरिक आणि विद्यार्थ्यांकरिता पोलीस दल अत्यंत सभ्य आणि सहकारी वृत्तीचे असले पाहिजे. पुणे आणि मुंबई शहरांना यापूर्वी दहशतवाद्यांनी लक्ष्य केले होते. असे हल्ले रोखण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा असणे आवश्यक आहे. सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या वाढत्या गुन्ह्यांबाबतही चिंता व्यक्त केली.

चंद्रकांत पाटील म्हणाले, राज्यात युतीचं सरकार स्थापन होताच पोलीस विभागात हस्तक्षेप करायचा नाही, असा निर्णय घेतला. वशिल्याने पोलीस भरती आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या ही पद्धत बंद केली. अधिकाऱ्यांना स्वातंत्र्य दिलं त्यामुळे नवनवीन चांगल्या गोष्टी घडल्या. जो सन्मान सैन्यदलातील जवानांना दिला जातो तो पोलीस कर्मचाऱ्यांना मिळाला पाहिजे तसेच नागरिकांसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांतून तो त्यांना मिळेल. संस्कार आणि धाक यांच्या समन्वयातून चांगला समाज तयार होईल. कार्यक्रमात पुणे शहर पोलीस दलाने राबविलेल्या विविध उपक्रमांत मदत करणाऱ्या पर्सिस्टंट, पंख सेवाभावी संस्था, व्होक्सवॅगन, होंडा कंपनीच्या अधिकाऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### पुण्यातील पोलीस वसाहतींसाठी २५ कोटी

पोलिसांना सन्मान, चांगले वातावरण दिले तर कामाचा दर्जा वाढण्यास मदत होईल. राज्यातील पोलिसांच्या वसाहतींची दुर्दशा झाल्याचे दिसून आले. यासाठी स्वतंत्र पोलीस हाउसिंग विभाग निर्माण केला. त्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय अधिकारी दिला आहे. पुणे शहरातील पोलीस वसाहतींचे बांधकाम करण्यासाठी २५ कोटींचा निधी मंजूर केला. या सोबतच ट्राफिक अवेअरनेस सेंटर आणि पोलिसांच्या मुलांच्या हॉस्टेलसाठी ५ कोटींची रक्कम देण्यात आली आहे.

Sakal Times - 23 August, 2019

WORLD POLICE AND FIRE GAMES

# Pune police constables win medals in China

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com




**COMMENDATION:** Commissioner of Police Dr K Venkatesham (3R) felicitated policemen who won medals at the World Police and Fire Games that were held in China.

**PUNE**
Three police constables from Pune city police have won a silver and two bronze medals at the World Police and Fire Games, an Olympic-style competition that was held in China.

Commissioner of Police Dr K Venkatesham felicitated the winners in the presence of Jt CP Ravindra Shisve and Additional CP (Administration) Sanjay Shinde on Wednesday.

Police Naik Mangesh Chavan won a silver medal in Karate, Head Constable Pradip Shahare won a bronze medal in the 800-metre run and Head Constable Manisha Thite won a bronze medal in the 400-metre run.

About 10,000 athletes representing law enforcement, firefighters and officers from corrections, probation, border protection, immigration and customs from over 70 countries across the globe competed in over 60 sports.

The World Police and Fire Games 2019 were held from August 8 till August 18, 2019, at Chengdu in China.

The World Police and Fire Games originated in San Jose, California in 1985.

Since then, the games have been held every two years in a different city across the globe.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो.
कोंढवा पोलिस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाटील पोलीस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलिसांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुधारण्यास मदत होत आहे. जनतेचा व सामान्य लोकांचा पोलिसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम प्रशंसनीय असून तो पोलिसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शक असा ठरला आहे.

मा. सादर सो.
दि. 18/05/19.
[signature]
पोलीस उपनिरीक्षक
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

माननिय महोदय,
दर्पण पुस्तिकांचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेला दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दरम्यान या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संकलित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

Mahadik
LPN 5991.
स्वाक्षरी



Man arrested for estranged girlfriend's murder attempt

Will act against illegal private security firms, warns police chief

बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हींचे लोकार्पण

बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारु

चालक व मालकांवर कारवाई करणार

अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई

शाखेकडून गुंडांची झाडाझडती

पाच जणांच्या टोळीला अटक

पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत

वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक

मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद

कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर

चार किलो गांजासह आरोपीला अटक

पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास

महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक

पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान

कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष

पोलिसांसह साजरा झाला मैत्री

नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक

गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक

पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे

चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हसू

पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'

पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम

Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore

सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात

उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच

एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत

नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार

Gang duping people with promise of real American dollars nabbed

अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास

सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला

एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार

पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन

दामिनींनी केले पाकीट परत

सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत

गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ

विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी

राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम

हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन

हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे

आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव

गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे

इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद